नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३९ | Issue - 39 | वार बुधवार दि. २५ जून २०२५ | Blow- Friday Date 25 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पाच लाख रुपयांपर्यंत पीएफ ॲडव्हान्स मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : ईपीएफओच्या सदस्यांना दिलासा देणारी अपडेट समोर आली आहे. जर तुम्हाला पीएफच्या खात्यातून काही कारणांसाठी ॲडव्हान्स म्हणून पैसे काढायचे असतील तर वाट पाहावी लागणार नाही. सरकारनं ऑटो क्लेम सेटलमेंटची मर्यादा १ लाख रुपयांवरुन ५ लाख रुपये करण्यात आली आहे. ही माहिती केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी दिली आहे.




### ईपीएफओकडून मोठी घोषणा; कर्मचाऱ्यांकडून निर्णयाचं स्वागत

ईपीएफओनं पीएफ ॲडव्हान्स क्लेम सेटलमेंटची ऑटो अप्रुव्हलची प्रक्रिया करोना संसर्गाच्या काळात सुरु केली होती. लोकांना कमी कालावधीत पैसे उप-लब्ध व्हावेत यासाठी ही प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. आतापर्यंत ऑटो क्लेम सेटलमेंटच्या दाव्यांसाठी रक्कम काढण्याची मर्यादा १ लाख रुपयांपर्यंत होती. ती ५ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. याचा फायदा आपत्कालीन स्थितीमध्ये ज्यांना पैसे हवेत त्यांच्यासाठी फायदेशीर ठरेल.

सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर या निर्णयासंदर्भात नेटकऱ्यांनी एपीएफओचं कौतुक केलं. एका यूजरनं म्हटलं की ईपीएफओनं हे चांगलं पाऊल उचललं आहे. ज्यांना पैशांची तातडीनं गरज असते त्यांना ५ लाख रुपयांपर्यंतच्या ऑटो क्लेम सेटलमेंटच्या नियमाचा फायदा होईल. ही फक्त सुविधा नसून कर्मचाऱ्यांचा सन्मान आहे.

ईपीएफओच्या एप्रिलच्या आकडेवारीनुसार १९.१४ लाख सदस्य जोडले गेले. मार्च २०२५ च्या तुलनेत ३१.३१ टक्के वाढ झाली आहे. गेल्या वर्षीच्या एप्रिलच्या तुलनेत १.१७ टक्के वाढ झाली आहे. नव्या सदस्यांच्या नोंदणीमध्ये १८ ते २५ लाख तरुणांचा समावेश आहे. तरुणांच्या आकडेवारीची संख्या ४.८९ लाख इतकी आहे. जी नव्या सदस्यांचा ५७.६७ टक्के इतकी आहे.

ईपीएफओकडे एप्रिलमध्ये नोंदणी झालेल्या एकूण सदस्याच्या संख्येत महाराष्ट्र आघाडीवर आहे. महाराष्ट्रातून सर्वाधिक सदस्यांची नोंदणी करण्यात आली.एप्रिलमध्ये १५.७७ लाख सदस्य पुन्हा ईपीएफओशी जोडले गेले.

ईपीएफओ खात्यातून पैसे काढण्यासाठी तुम्हाला ईपीएफओ यूएएन पोर्टलवर लॉगीन करावं लागेल. तुमचा यूएएन क्रमांक आणि पासवर्ड नोंदवून लॉगीन करा. यानंतर तुम्हला ऑनलाईन सर्व्हिसेस पर्यायावर क्लिक करा. यानंतर क्लेम फॉर्म ३१ वर क्लिक करुन पुढे जा. यानंतर तुम्हाला तुमचा बँक खाते क्रमांक नोंदवावा लागेल. बँक खाते क्रमांक नोंदवून तो वेरिफाय केल्यानंतर पुढचे पर्याय उपलब्ध होतील.

पीएफ खाते पासबूक क्रमांक निवडून आणि कोणत्या कारणासाठी रक्कम हवीय ती नोंदवा. यानंतर किती रक्कम काढायची आहे, ती नोंदवा. यानंतर आधार ओटीपीद्वारे फॉर्म सबमिट करा. ऑटो क्लेम सेटलमेंटमुळं तीन ते चार दिवसात पैसे खात्यात येऊ शकतील.

## महानिर्मिती राज्यात उभारणार १०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; राज्यातील तीन लाख शेतकऱ्यांना लाभ होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीज पुरवठा देऊन शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. राज्यात शाश्वत विकासास चालना देण्यासाठी महानिर्मितीतर्फे १,०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प 'मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.०' अंतर्गत लवकरच कार्यान्वित होणार आहेत. या प्रकल्पांमुळे राज्यातील तीन लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

महानिर्मिती ही म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्यादित या कंपनीची संपूर्ण मालकीची उपकंपनी असून, सुमारे १३,८८० मेगावॅट क्षमतेसह भारतातील सर्वात मोठ्या राज्य-नियंत्रित विद्युत उत्पादकांपैकी एक आहे. नॅशनल थर्मल पॉवर कंपनी नंतर ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची राज्य मालकीची जनरेशन कंपनी आहे. औष्णिक, वायू, जल विद्युत आणि सौर असे ऊर्जा उत्पादन क्षेत्रात वैविध्य असलेली महानिर्मिती ही कंपनी नवीकरणीय ऊर्जेचे प्रकल्प सुरू करत आहे, ज्यामुळे वीज ग्राहकांना कमी दरात वीजपुरवठा करत कार्बन उत्सर्जनात घट होण्यास मदत होणार आहे.

द रॉकफेलर फाउंडेशन, इकीया फाउंडेशन आणि बेझॉज अर्थ फंड यांच्या सहकार्याने स्थापन झालेली जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट) ही संस्था विकसनशील देशांमध्ये न्याय्य, समतोल व वेगवान हरित ऊर्जेसाठी मदत करते. जीईएपीपी इंडिया ही जीईएपीपी एलएएलसीची भारतीय शाखा असून, भारतात विशेषतः वितरणक्षम ऊर्जेसाठी उपयुक्त उपक्रमांची अंमलबजावणी करत आहे.






पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीज पुरवठा देऊन शेतीची उत्पादनक्षमता वाढविणे हे राज्य शासनाचे ध्येय आहे. कृषी ग्राहकांच्या सेवाखर्चात कपात करून शाश्वत ऊर्जेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आहे. यातून वितरित पद्धतीने नवीकरणीय ऊर्जा वापरून कृषी वापरासाठी सौर प्रकल्प जोडण्यात येतात. सन २०२५ पर्यंत सुमारे ३०% फीडरचे सोलरायझेशनचे उद्दिष्ट 'मिशन २०२५' म्हणून निश्चित केले आहे, ज्यामध्ये शेतक-यांना दिवसा वीज देण्यासाठी ०.५ मेगावॅट ते २५ मेगावॅट क्षमतेचा कृषी भार असलेल्या वितरण उपकेंद्रापासून ५ - १० किमी परिघात विकेंद्रित सौर प्रकल्प उभारले जातात.

जीईपीपी इंडिया हा प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रकल्प मॉनिटरिंग युनिट सुविधा आणि एक डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करत आहे, माहितीचे संकलन, या प्रकल्पाची सद्यस्थिती आणि प्रकल्पांचे सुलभ व्यवस्थापन शक्य होईल. जीईपीपीच्या तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा उपयोग करून मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.० ची प्रभावी अंमलबजावणी करणे. महाराष्ट्रात शाश्वत विकासास चालना देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्येश आहे.

हे सौर ऊर्जा प्रकल्प वेळेत पूर्ण करणे करता धोरणात्मक संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार असून ही समिती मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेबाबत मार्गदर्शन करेल. या समितीमध्ये सर्व सहभागधारक यांचा समावेश असणार आहे.

जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅने व महानिर्मितीतर्फे सेंट्रल डॅश बोर्ड तयार करण्यात येणार असून यामार्फत जमीन संपादन ते प्रकल्प उभारणी प्रगती यांचे दैनंदिन तत्वावर अवलोकन करण्यात येणार आहे. सर्व भागधारकांसाठी या डॅश बोर्ड वापराबाबतचे प्रशिक्षण देण्यात येऊन हे सौर प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. या प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत.

## महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाला गती, २० हजार ७८७ कोटींची तरतूद; राज्यातील १२ जिल्ह्यांना जोडणारा ८०२ कि.मी.चा द्रूतगती मार्ग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या पूर्वेकडील पवनार (जि.वर्धा) येथून ते पश्चिमेकडील पत्रादेवी (जि.सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र-गोवा सीमेला जोडणाऱ्या महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग (शिघ्रसंचार द्रूतगती मार्ग) प्रकल्पाला गती देण्यासाठी २० हजार ७८७ कोटी रुपयांच्या तरतुदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील १२ जिल्ह्यांना जोडणारा हा द्रूतगती मार्ग ८०२.५९२ किलोमीटर लांबीचा असणार आहे.

महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग राज्यातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांना जोडणार आहे. पुढे तो कोकण द्रूतगती महामार्गास गोवा-महाराष्ट्र सीमेवर जोडला जाणार आहे. या महामार्गामुळे राज्यातील प्रमुख शक्तीपीठे माहुर, तुळजापूर व कोल्हापूर तसेच अंबेजोगाई ही तीर्थक्षेत्रे जोडली जाणार आहेत. तसेच संतांची कर्मभूमि असलेले मराठीचे आद्यकवी अंबेजोगाईस्थित मुकूंदराज स्वामी, जोगाई देवी तसेच १२ ज्योतिर्लिंगांपैकी २ औंढानागनाथ व परळी वैजनाथ, महाराष्ट्राचे आराध्य पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, यासह कारंजा-लाड, अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर ही दत्त गुरूंची धार्मिक स्थळे जोडली जाणार आहेत. या महामार्गामुळे नागपूर ते गोवा हे १८ तासांच्या प्रवासाचे अंतर ८ तासांवर येणार आहे.

या प्रकल्पाच्या भूसंपादनाकरिता हुडकोकडून १२ हजार कोटींचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. या निधीतून सुमारे ७ हजार ५०० हेक्टरचे भूसंपादन करण्यात येणार आहे. हा संपूर्ण प्रकल्प महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणार आहे. हा महामार्ग महाराष्ट्रातील शक्तीपीठांना एकत्र जोडण्याचा प्रयत्न असून, त्यातून पर्यटन, वाहतूक व ग्रामीण भागाचा विकास साधण्याचे उद्दिष्ट आहे.

## राज्यातील शेतकऱ्यांना अनुदानावर गुणवत्तापूर्ण बियाणे देण्यासाठी कृषी विभाग कटिबद्ध : कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबियाअंतर्गत सन २०२५-२६ या वर्षात शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर प्रमाणित सोयाबीन व भुईमूग बियाण्यांचे वितरण करण्यात येत आहे. हे वितरण महाडीबीटी पोर्टलद्वारे प्रथम अर्ज, प्रथम सेवा (ऋऊऋड) तत्वावर पार पाडण्यात येत आहे. राज्यातील शेतकऱ्यांना अनुदानावर गुणवत्ता असलेले बियाणे देण्यासाठी कृषी विभाग कटिबद्ध असल्याचे कृषिमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

या योजनेअंतर्गत सोयाबीनसाठी एकूण ४६,५०० क्विंटल आणि भुईमूगसाठी १६,००० क्विंटल बियाण्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. सद्य:स्थितीत महाडीबीटी पोर्टलद्वारे सोयाबीनसाठी ४४,३१७.१३ क्विंटल (९५.३१%) आणि भुईमूगसाठी ६,८५७.५४ क्विंटल (४२.८६%) बियाणे शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी अर्ज केल्यानंतर त्यांना 'एसएमएस'द्वारे सूचना देण्यात येत असून, त्यानुसार संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून पाच दिवसांच्या आत बियाण्याचा लाभ घ्यावा लागतो. अन्यथा लाभाची नोंद रद्द केली जाते. बियाणे एकदाच उचलणे आवश्यक असून, पुन्हा मागणी केल्यास बियाण्याची किंमत लागू असणार आहे.

संबंधित बियाणे वितरक संस्थांकडून महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृभको, क्खङ इ. - बियाण्यांचा पुरवठा तालुकास्तरावर करण्यात येत आहे.

**जिल्ह्यात पालखी सोहळ्यांचे आगमन होण्यापूर्वी पालखी मार्गावरील कामे पुर्ण करावीत**

**अनाधिकृत होर्डीगवर तात्काळ कारवाई करावी**

## आषाढी यात्रेच्या अनुषंगाने चंद्रभागा नदी पूरजन्य परिस्थितीचा आराखडा त्वरित सादर करावा : विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : आषाढी शुध्द एकादशी सोहळा दि. ०६ जुलै २०२५ रोजी असून, या सोहळ्यात वारकऱ्यांसाठी चंद्रभागा स्नान फार पवित्र मानले जाते. यात्रा कालावधीत चंद्रभागा स्नानासाठी नदी पात्रात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते. सद्य:स्थितीत भीमा नदी पात्रात उजनी व वीर धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे. वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी चंद्रभागा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग किती प्रमाणात आल्यानंतर वाळवंट किती प्रमाणात शिल्लक राहिल या पुरजन्य परस्थितीचा आराखडा तयार करून त्वरित सादर करावा, अशा सूचना विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी यावेळी दिल्या.

आषाढी यात्रेच्या अनुषंगाने श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास, पंढरपूर येथे बैठक घेण्यात आली बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, भीमा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता एस.के.हरसुरे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे श्री.घोडके, मोटार वाहन निरिक्षक संतोष झगडे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### पालखी मार्गावर व शहरातील अतिक्रमणे तात्काळ काढावीत

यावेळी विभागीय आयुक्त पुलकुंडवार म्हणाले, चंद्रभागा नदीची वाढती पाणी पातळी लक्षात घेवून वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. वारकरी-भाविकांना तसेच दिंड्यांना वाहतुकीचा कोणाताही त्रास होऊ नये यासाठी पालखी मार्गावरील व शहरातील अतिक्रमणे तात्काळ काढावीत. पालखी मार्ग व शहरातील अधिकृत होर्डीगचे स्ट्रक्चरल ऑडीट करावे. तसेच अनाधिकृत होर्डीगवर तात्काळ कारवाई करुन पुन्हा ते होर्डीग लागणार याची दक्षता घ्यावी. होर्डीगमुळे कोणतीही अनुचित घटना घडल्यास संबधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.

तसेच शहरातील नगरपालिकेच्या बोअरवेलसह खाजगी बोअरवेलव्दारे पाणीपुरवठा करावा. नदी पात्रात धोक्याच्या ठिकाणी माहिती फलक लावावेत, यात्रा कालावधीत अन्न व औषध प्रशासनाने खाद्यपदार्थ, प्रसादाची दुकाने यांच्या वेळोवेळी तपासण्या कराव्यात. तसेच मठ व धर्मशाळा येथे मोठ्या प्रमाणात अन्न व फराळाचे पदार्थ बनविण्यात येतात. याबाबत संबधितांना योग्य मार्गदर्शन करावे. तसेच तपासणीसाठी पथके तैनात करावीत अशा सूचनाही विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी दिल्या.



यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, यावर्षी पाऊस जास्त असण्याची शक्यता असल्याने पालखी तळांवर चिखल होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्ह्यातील सर्वच पालखी तळांवर मुरमीकरण करण्यात येत आहे. तसेच वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी पालखी मार्गावर वॉटरप्रूफ मंडप,जर्मन हँगर लावण्यात येणार आहेत. पालखी मार्गावर भाविकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी वेळोवेळी पिण्याच्या पाण्याच्या तपासण्या करण्यात येत आहेत. मुबलक प्रमाणात सुलभ शौचालयाची उपलब्धता तसेच त्यांच्या स्वच्छतेसाठी आवश्यक मनुष्यबळ व सक्शन मशीन वाहने ठेवण्यात येणार आहेत. या वाहनांना विशेष वाहन म्हणून घोषित करण्यात आले आहे. जेणेकरून शौचालयाची वेळोवेळी स्वच्छता करण्यात येईल. त्याचबरोबर महिला भाविकांसाठी स्नानगृहांची संख्या वाढवण्यात आली आहे. आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत गर्दी व्यवस्थापन, चंद्रभागा नदी पात्रात होडीतून होणारी जलप्रवासी वाहतूक आदीबाबत आवश्यक नियोजन करण्यात आले असून, होडीच्या चालकांना व मालकांना होडीत जलप्रवासी वाहतूकीसाठी एकूण १ हजार ५० लाइफ जॅकेटची उपलब्धता करण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी यावेळी सांगितले. तसेच वारीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदे मार्फत करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

## संपादकीय....

### सौर ऊर्जा प्रकल्प

पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीज पुरवठा देऊन शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. राज्यात शाश्वत विकासास चालना देण्यासाठी महानिर्मितीतर्फे १,०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प 'मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.०' अंतर्गत लवकरच कार्यान्वित होणार आहेत. महानिर्मिती ही म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्यादित या कंपनीची संपूर्ण मालकीची उपकंपनी असून, सुमारे १३,८८० मेगावॅट क्षमतेसह भारतातील सर्वात मोठ्या राज्य-नियंत्रित विद्युत उत्पादकांपैकी एक आहे. नॅशनल थर्मल पॉवर कंपनी नंतर ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची राज्य मालकीची जनरेशन कंपनी आहे. औष्णिक, वायू, जल विद्युत आणि सौर असे ऊर्जा उत्पादन क्षेत्रात वैविध्य असलेली महानिर्मिती ही कंपनी नवीकरणीय ऊर्जेचे प्रकल्प सुरू करत आहे, ज्यामुळे वीज ग्राहकांना कमी दरात वीजपुरवठा करत कार्बन उत्सर्जनात घट होण्यास मदत होणार आहे. द रॉकफेलर फाउंडेशन, इकीया फांउडेशन आणि बेझॉज अर्थ फंड यांच्या सहकार्याने स्थापन झालेली जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट) ही संस्था विकसनशील देशांमध्ये न्याय्य, समतोल व वेगवान हरित ऊर्जेसाठी मदत करते. जीईएपीपी इंडिया ही जीईएपीपी एलएलसीची भारतीय शाखा असून, भारतात विशेषतः वितरणक्षम ऊर्जेसाठी उपयुक्त उपक्रमांची अंमलबजावणी करत आहे. पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीज पुरवठा देऊन शेतीची उत्पादनक्षमता वाढविणे हे राज्य शासनाचे ध्येय आहे. कृषी ग्राहकांच्या सेवाखर्चात कपात करून शाश्वत ऊर्जेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आहे. यातून वितरित पद्धतीने नवीकरणीय ऊर्जा वापरून कृषी वापरासाठी सौर प्रकल्प जोडण्यात येतात. सन २०२५ पर्यंत सुमारे ३०% फीडरचे सोलरायझेशनचे उद्दिष्ट 'मिशन २०२५' म्हणून निश्चित केले आहे, ज्यामध्ये शेतक-यांना दिवसा वीज देण्यासाठी ०.५ मेगावॅट ते २५ मेगावॅट क्षमतेचा कृषी भार असलेल्या वितरण उपकेंद्रापासून ५ - १० किमी परिघात विकेंद्रित सौर प्रकल्प उभारले जातात.

# आषाढी यात्रा पंढरपूर जड वाहतुक मार्गात बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका):- पंढरपूर आषाढी यात्रे कारणामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी, पंढरपूर उपविभाग पंढरपूर यांनी त्यांचेकडील पत्र जावक क्रं २३००/२०२५ दि. ०५ जून २०२५ अन्वये श्री क्षेत्र पंढरपूर येथे दि. ३० जून ते १० जुलै २०२५ आषाढी शुध्द पौर्णिमा या कालावधीत आषाढी यात्रा भरणार आहे. वारीचा मुख्य दिवस दि. ०५ व ०६ जुलै २०२५ असून, यात्रा कालावधीत वाहतुकीची कोंडी निर्माण होवू नये म्हणुन शहरातील महत्वाचे रस्त्यावर पंढरपूर शहरात प्रवेश करणा-या वाहनांबाबत, शहरातून बाहेर जाणा-या वाहतुकीबाबत, पंढरपूर शहरातील अंतर्गत वाहतुकीबाबत, पार्कीग व्यवस्था, एकेरी मार्ग याबाबत पुढील आदेश निर्गमित आहेत.

सोलापूर ग्रामीण महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ च्या कलम ३३ (१) (ब) अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद व पोलीस अधीक्षक (ग्रामीण) अतुल कुलकर्णी यांना प्राप्त असलेल्या अधिकारान्वये दि. ३० जून २०२५ रोजी ००.०१. ते ०८ जुलै २०२५ रोजी २४.०० वाजे पर्यत पंढरपूर व पंढरपूर परिसरात वाहतुकीची कोंडी निर्माण होवू नये म्हणुन पंढरपूर शहरात प्रवेश करणा-या वाहनांबाबत, शहरातून बाहेर जाणा-या वाहतुकीबाबत, पंढरपूर शहरातील अंतर्गत वाहतुकीबाबत, पाकींग व्यवस्था, एकेरी मार्ग अनुषंगाने पुढील आदेश देत आहे.

**पंढरपूर शहरात प्रवेश करणा-या वाहनांबाबत :-**

अहिल्यानगर, बार्शी, टेंभुर्णी, करकंब कडून येणारी सर्व प्रकारची वाहने करकंब क्रॉस रोड (अहिल्या चौक), शेटफळ चौक मार्गे मोहोळ रोड विसावा येथे पार्कीग करतील तसेच ६५ एकर च्या मागे असलेल्या नगरपरिषदेच्या जागेत मध्ये पार्किंग करतील.

मोहोळ मार्गे सोलापूर कडून येणारी सर्व प्रकारची वाहने ही मोहोळ रोड विसावा येथे (भिमा बसस्थानक) पार्कीग करतील. तसेच ६५ एकर येथे पार्कीग करतील. पुणे, सातारा, वाखरीमार्गे येणारी वाहने इसबावी विसावा व ५२ एकर मैदानात पार्कीग करतील. कराड, आटपाडी, दिघंची मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस मध्ये पाकींग करतील.

कोल्हापूर, सांगली, मिरज, सांगोला मार्गे येणारी वाहने कासेगाव फाटा, टाकळी बायपास मार्ग वेअर हाऊस मध्ये पार्किंग करतील. विजापूर, मंगळवेढा मार्गे येणारी वाहने कासेगाव फाटा, टाकळी मार्गे वेअर हाउस मध्ये पार्कीग करतील व यमाई तुकाई मंदिर मैदान व बिडारी बंगला येथे पाकींग करतील.

सोलापूरकडून तिन्हे मार्गे पंढरपूर कडे येणाऱ्या सर्व वाहनांना सुस्ते चौक येथून पंढरपूर कडे येण्यास मनाई आहे. सदर मार्गावरून येणारी वाहने सुस्ते चौक येथून तुंगत गावातून पुढे इच्छित मार्गाने जातील.

**पंढरपूर शहरातून बाहेर जाणा-या वाहतुकीबाबत :-**

अहिल्यानगर ,टेंभुर्णी, सोलापूर, लातूर, धाराशिव कडे जाणा-या सर्व गाडया सावरकर चौक, नवीन कराड नाका, कॉलेज क्रॉस रोड, कौटाळी बायपास, नविन सोलापूर नाका, अहिल्या चौक या मार्गाने जातील,

पुणे, सातारा कडे जाणा-या सर्व गाडया सावरकर चौक, नवीन कराड नाका, कॉलेज क्रॉस रोड, वाखरी मार्ग जातील. विजापूर, कराड, आटपाडी, कोल्हापूर, सांगली, मिरज, मंगळवेढाकडे जाणा-या सर्व गाडया सावरकर चौक, नवीन कराड नाका, गादेगाव फाटा पासून संबंधीत आपल्या मार्गे जातील.

**पंढरपूर शहतील अंतर्गत वाहतुकीबाबतः-**

दि. ३० जून ते ०८ जुलै २०२५ पर्यंत संपूर्ण प्रदक्षिणा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनास बंद करण्यात येत आहे. महाव्दार चौक ते शिवाजी चौक हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीसाठी प्रवेश बंद करण्यात येत आहे. सावरकर चौक ते शिवाजी चौक हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीसाठी प्रवेश बंद करण्यात येत आहे. अहिल्यानगर, संभाजी नगर, बाशी, सोलापूर या मार्गावरून येणारी फक्त हलकी वाहने अहिल्यादेवी चौक, तीन रस्ता मार्ग नवीन पुलावरून अंबाबाई पंटागणात उतरतील. नियमित ट्रक व यात्रेसाठी येणा-या एस.टी बसेस यांना जुना दगडीपुल, नवीन पूल, तीन रस्ता मार्ग बंद ठेवण्यात येत आहे, मंगळवेढा नाका, लहुजी वस्ताद चौक महात्मा फुले चौक, या मार्गाने शहरात सर्व प्रकारचे वाहनास प्रवेश बंद करण्यात येत आहे. अंबाबाई पटांगण ते भजनदास चौक, अंबाबाई पंटागण ते अर्बन बँक, सावरकर चौक ते शिवाजी चौक ते अर्बन बँक, भक्ती मार्ग ते काळामारूती चौक हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांस बंद करण्यात येत आहे.

**पार्किंगची व्यवस्थाः-**

अहिल्यानगर, बाशी, सोलापूर, मोहोळकडून येणारी सर्व प्रकारची वाहने अहिल्या चौक, तीन रस्ता मार्गे मोहोळ रोड विसावा,भिमा बस स्टँड येथे पाकींग करतील तसेच ६५ एकर मागे नगरपरिषदेच्या पार्किंग येथे पाकींग करतील. पुणे, सातारा, वाखरी मार्गे येणारी वाहने इसबावी विसावा व ५२ एकर मैदानात पार्कीग करतील. कराड, आटपाडी, दिघंची मार्गे येणारी वाहने वेअर हाउस मध्ये पाकींग करतील. कोल्हापूर, सांगली, मिरज, सांगोला मार्गे येणारी वाहने कासेगाव फाटा, ढाकळी बायपास मार्गे वेअर हाउस मध्ये पार्किंग करतील. विजापूर, मंगळवेढा मार्गे येणारी वाहने कासेगाव फाटा, टाकळी मार्गे वेअर हाउस मध्ये पार्कीग करतील व यमाई-तुकाई मंदिर मैदान तसेच बिडारी बंगला येथे पार्कीग करतील. यात्रेच्या कालावधीत पंढरपूर शहरात येणारी हलकी वाहने अंबाबाई पंटागण, गजानन महाराज मठ पार्कीग, नगरपालिका पार्कीग, क्रिडा संकुल, सखुबाई पार्कीग येथे व तसेच संबंधीत मठामध्ये पार्क होतील. व इतर वाहने जुन्या कराड नाक्या समोरील मार्केट यार्ड येथे पार्क होतील. शहरामधील अंतर्गत रोडवर कोणत्याही ठिकाणी गाड्या पाकीग होणार नाही.

**एकेरी मार्ग :-**

कॉलेज क्रॉस रोड ते सरगम चौक ते सावरकर चौक ते नवीन कराड नाका या मार्गावर एकेरी वाहतुक राहील.

**एस. टी बसेस :-**

विदर्भ, मराठवाडा, सोलापूर विभागातील यात्रेकरीता येणा-या एस.टी बसेस या भिमा बस स्थानक (यात्रेकरीता करण्यात आलेले) या ठिकाणी भाविकांना सोडतील व त्याच ठिकाणी पार्क करतील,

अहिल्यानगर विभाग, नाशिक विभाग व जळगाव विभाग याबाजूकडून यात्रेकरीता येणा-या बसेस या विठ्ठल अलायटिंग पॉईंट (अहिल्या चौक जवळ) या ठिकाणी भाविकांना सोडतील व विठ्ठल सहकारी साखर कारखाना गुरसाळे या ठिकाणी पार्क होतील, मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली व कोकण विभाग या बाजूकडून यात्रेकरीता येणा-या एस.टी बसेस या कासेगाव फाटा, टाकळी बायपास, गादेगाव फाटा, गादेगाव, सातारा नाला, बाजीराव विहीर, कौठाळी बायपास फाटा, जुन्या अकलुज रोडने चंद्रभागा बस स्थानक या ठिकाणी येतील, व वरील मार्गे भाविकांना घेवून परत जातील. सदर बसेस या चंद्रभागा बस स्थानक या ठिकाणीच पार्क होतील. कोल्हापूर, सांगली, मंगळवेढा व कोकण विभाग या बाजूकडून यात्रेकरीता येणा-या एसटी बसेस या कासेगाव फाटा, बिडारी बंगला येथुन जुना कासेगांव रोड आय. टी. आय कॉलेज येथे पार्क करतील व वरील मार्गे भाविकांना घेवुन परत जातील.

**शहरातून जाणा-या जड वाहतुकीबाबतः-**

पंढरपूर शहराकडे येणारी जड-अवजड वाहतुकीच्या वाहतुक नियम नाबाबत स्वतंत्र जाहिरनामा निर्गमित करण्यात येत आहे. असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व पोलीस अधिक्षक (सोलापूर ग्रामीण) अतुल कुलकर्णी यांनी आदेशित केले आहे.

# २९ जून रोजी मनेगाव येथील नूतन जवाहर विद्यालयाचे वरिष्ठ लिपिक दत्तात्रय लोंढे यांचा सेवापूर्ती समारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सिन्नर/प्रतिनिधी : मनेगाव येथील नूतन जवाहर विद्यालयाचे वरिष्ठ लिपिक दत्तात्रय मारुती लोंढे यांचा सेवापूर्ती समारंभ रविवार दि. २९ जून रोजी सकाळी ठीक १० :०० वाजता मातोश्री नर्मदा लॉन्स येथे संपन्न होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सिन्नर तालुका संचालक कृष्णाजी भगत असतील. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ड. नितीन ठाकरे यांच्या शुभहस्ते सेवापूर्ती सोहळा संपन्न होणार आहे.

यावेळी मविप्र समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनिल ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, सभापती बाळासाहेब क्षिरसागर, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी ,संचालक ड संदिप गुळवे, प्रविण जाधव, डॉ.सयाजी गायकवाड ,रमेश पिंगळे, कार्यकारणी मंडळाचे सर्व संचालक ,सेवक संचालक संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ. भास्करराव ढोके, संस्थेचे विविध भागाचे शिक्षणाधिकारी आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे .

श्री. लोंढे हे ३२वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होत आहे. त्यांनी सन १९९२ पासून सिन्नर महाविद्यालयात आपल्या सेवेचा श्रीगणेशा केला.त्यांनी वाजे विद्यालय सिन्नर,तिसगाव, नांदगाव, जाखोरी ,सोनांबे या विद्यालयात कनिष्ठ लिपिक म्हणून तर मनेगाव येथील विद्यालयात वरिष्ठ लिपिक म्हणून काम केले आहे. या विद्यालयात सेवा करीत असतानाच त्यांनी मविप्र संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात जवळपास १८ वर्षे उत्कृष्ट कामकाज केले आहे. तरी या सेवापूर्ती सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन शालेय समितीचे अध्यक्ष नितीन शिंदे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिमा हांडगे, पर्यवेक्षक राजेंद्र गांगुर्डे आदींसह शालेय समितीचे सदस्य शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.

# कळंब येथे शिवसेना उबाठा नूतन तालुकाप्रमुख सचिन काळे यांचा कळंब तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे : येथे श्री.पांडुरंग कुंभार यांच्या संपर्क कार्यालयात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कळंब तालुका प्रमुख पदी डिकसळ गाव चे मा.उपसरपंच व निष्ठावंत शिवसैनिक श्री.सचिन चंद्रकांत काळे यांची निवड झाल्या बद्दल कळंब तालुका काँग्रेस कमिटी च्या वतीने तालुका अध्यक्ष श्री.पांडुरंग कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित कळंब कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक हरीभाऊ कुंभार, काँग्रेस किसान सेल अध्यक्ष विलास करंजकर, काँग्रेस अल्पसंख्याक सेल तालुका अध्यक्ष शहाजहान शिकलगार, युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष शशिकांत निर्फळ, युवक काँग्रेस जिल्हा सचिव भूषण देशमुख, कळंब शहर काँग्रेस कार्याध्यक्ष सचिन गायकवाड, अनुसूचित जमाती तालुका अध्यक्ष बबन हौसलमल, युवक काँग्रेस विधानसभा उपाध्यक्ष रोहित कसबे, अश्रुबा बिक्कड, संदीप गायकवाड, नितीन वाघमारे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# सीमाराणी बागुल यांना साहित्य साधना पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक/प्रतिनिधी

साहित्यकणा फाउंडेशन व भाव सुमन प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील साहित्यिकांना दरवर्षी पुरस्कार दिले जातात. २०२५ यावर्षी देण्यात येणाऱ्या साहित्य साधना पुरस्कारासाठी नाशिक येथील रहिवासी उपक्रमशील प्राथमिक शिक्षिका व कवयित्री सीमाराणी बागुल यांना साहित्य साधना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. २०२२ मध्ये पहिला कवितासंग्रह जीवनाची शाळा याचे प्रकाशन कोपरगाव येथे ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत दादा वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच दहा मे २०२५ रोजी नारायण सुर्वे कवी कट्टा येथे गर्भारलेल्या मातीतून या दुसऱ्या कवितासंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कोळगावकर ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत दादा वानखेडे यांच्या हस्ते कवितासंग्रहाचे प्रकाशन झालेले आहे.

सीमाराणी बागुल यांच्या साहित्यिक कार्याची दखल गर्भारलेल्या मातीतून या काव्यसंग्रहाला हा पुरस्कार दिला जाणार आहे.

रविवार दिनांक २९ जून २०२५ रोजी सकाळी दहा वाजता कॅंडा कॉर्नर येथील समर्थ मंगल कार्यालयात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. अशी माहिती व संजय गोरडे यांनी दिली आहे.

# संत गजानन महाराज पालखी मार्गावरील वाहतूक नियमन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर (जिमाका) ज्या अर्थी उपविभागीय पोलीस अधिकारी, सोलापूर विभाग सोलापूर यांनी त्यांचेकडील पत्र जावक क्रं ३२४६ /२०२५ दिनांक १९ जून २०२५ अन्वये श्री संत गजानन महाराज संस्थान, शेगाव येथुन श्री ची पालखी पायी पंढरपूर येथे प्रत्येक आषाढीवारीसाठी येत असते. सदर पालखी ही सोलापूर तालुका पोलीस ठाणे हददीतील धुळे-सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावरून दिनांक २८जून २०२५रोजी ०३.०० वाजणेच्या सुमारास धाराशिव जिल्हयातून सोलापूर जिल्हयात प्रवेश करून उळेगाव येथे मुक्कामास असते, दिनांक २९ जून २०२५ रोजी पहाटे ०५.०० वा.चे दरम्यान पालखी उळेगाव येथुन प्रस्थान करून सोलापूर शहरात जाते व तेथे पालखी दोन दिवस मुक्कामी असते. दिनांक ०१ जुलै २०२५ रोजी पालखी सोलापूर येथुन प्रस्थान करून सोलापूर मंगळवेढा महामार्गावरील तिन्हे या गावी मुक्कामी असते. त्यांनतर दिनांक ०२ जुलै २०२५ रोजी पुढे प्रस्थान होवून पालखी माचणूर येथे मुक्कामी असते. तर दिनांक ०३ जुलै २०२५ रोजी पालखी माचणूर येथून प्रस्थान होवून पुढे मंगळवेढा येथे मुक्कामी असते. सदर पालखी सोहळयामध्ये पालखी सोबत पायी जाणारे वारकरी व वाहने असतात. तसेच श्रींच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी आजुबाजुच्या गावातील लोक मोठ्या प्रमाणात येत असतात. अशातच या महामार्गावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने पालखी सोहळा हददीतुन पुढे घेवुन जाणे अत्यंत आव्हानात्मक आहे. त्यामुळे सदर पालखी मार्गावरील वाहतुकीचे नियमन करणे आवश्यक आहे.

तथापी संत गजानन महाराज पालखीचे लहान स्वरूप, पालखी सोहळयामधील सहभागी होणा-या भाविकांची शिस्त तसेच पालखी ज्या मार्गावरून जाते (सोलापूर-तुळजापूर, सोलापूर-मंगळवेढा) हे मार्ग वाहतुकीच्या दृष्टीने चौपदरी असल्याने सदरचे महामार्ग वाहतुकीकरीता पुर्ण बंद करणे उचित होणार नसल्याने आम्ही जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद (भा.प्र.से.) व पोलीस अधीक्षक अतुल वि. कुलकर्णी (भा.पो.से.), सोलापूर ग्रामीण महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ च्या कलम ३३ (१) (ब) अन्वये संत गजानन महाराज पालखी मार्गावरील वाहतूक नियमनाबाबत संबंधीत उपविभागीय पोलीस अधिकारी यांना पालखी मार्गावरील वाहतुकीचे नियमन करणेबाबत खालीलप्रमाणे आदेश देत आहोत.

पालखी सोहळा व भाविकांच्या सुरक्षिततेसाठी श्री. संत गजानन महाराज पालखी व पायी चालत जाणारे वारकरी ज्या मार्गावरून जसजसे पुढे येत जातील, फक्त त्याच मार्गावरील वाहतुक (पालखी जात असलेल्या मार्गिकेमधून जाणारी वाहतुक) त्या भागापुरती टप्प्या टप्याने बंद करून त्या - त्या भागापुरती वाहतुक रस्त्यावरील दुसरे बाजूचे मार्गिकेमधून (लेनने) वळविण्यात यावी.

सदरच्या पालखी महामार्गावर आवश्यक त्या ठिकाणी बॅरीकेटींग करून पुरेशा प्रमाणात बंदोबस्त नेमून सदर पालखी सोहळयात कोणत्याही प्रकारची वाहने आडवी येणार नाहीत याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

असा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद (भा.प्र.से.), पोलीस अधीक्षक सोलापुर ग्रामीण अतुल वि. कुलकर्णी (भा.पो.से.) यांनी दिला आहे .

# भारतीय जनता पार्टी यांच्यावतीने विद्यार्थ्यांना वही वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे विद्यार्थ्यांना वही वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. तसेच ऑपरेशन सिंदूर मध्ये उत्कृष्ट रित्या कामगिरी बजावल्याबद्दल सचिन लोहार या सैनिकाचा सुद्धा सत्कार करण्यात आला.

यावेळी भारतीय जनता पार्टी जैन प्रकोष्ट कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष जयपाल काणे, दत्तवाड गावचे मा.डे. सरपंच तसेच भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष राजू पाटील, सुनील रेळेकर आनंद उन्हाळे ,संजय बदामे, संभाजी खोत ,पट्टेकरी व भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# टोकन दर्शनाचे बोगस पास घेऊन प्रवेश करणाऱ्यावर कारवाई करण्यात येणार

## भाविकांनी मंदिर समितीच्या अधिकृत संकेस्थळावरून बुकींग करावे, मंदिर समितीचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर दि.२४ :- श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या दर्शनासाठी येणा-या भाविकांना सुलभ व जलद दर्शन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने दि. १५ जून पा-सून टोकन दर्शन प्रणालीची अंमलबजावणी करण्यात आली आहे. तथापि, दि. २४ जून रोजी टोकन दर्शनाचे बोगस पास घेऊन टोकन दर्शन रांगेत प्रवेश करणा-या हिंगोली जिल्ह्यातील ६ व्यक्तींना पोलिसांच्या ताब्यात देऊन कडक कारवाई येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

मंदिर समिती मार्फत दर्शनरांगेतील भाविकांचे सुलभ व जलद दर्शन होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार टोकन दर्शन प्रणाली सुरू करण्यात आली आहे. त्या टोकन दर्शन प्रणालीचे पासेस मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर बुकींगची सोय आहे. त्यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. याशिवाय त्याच्या चांगल्या प्रतिक्रिया देखील उमटत आहेत.

मात्र, दि. २४ जून रोजी सकाळी ९ वाजता हिंगोली जिल्ह्यातील पार्वतीबाई बापूराव बेले, लक्ष्मीबाई केशवराव बळे, संध्या मारूतीराव सातपुते, अरूणा विठ्ठलराव सा-तपुते, सुधाकर रामचंद्र भालेराव व केशव गणपतराव हरबळे ह्या व्यक्तीं टोकन दर्शन प्रणालीचे बोगस पास घेऊन टोकन दर्शन रांगेतील प्रवेशद्वारावर आल्यानंतर नियमानुसार पासची तपासणी केली असता, पास बोगस असल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे त्यांना पंढरपूर शहर पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देऊन,

### कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती

त्यांच्यावर कारवाई करण्याची कार्यवाही सुरू आहे.

मंदिर समितीच्या वतीने असे आव-ाहन करण्यात येते की, टोकन दर्शन प्रणा-लीचे पासेस मंदिर समितीच्या https://www.vitthalrukminimandir.org या अधिकृत संकेतस्थळावरून बुकींग करावेत. जेणेकरून आपली फसवणूक होणार नाही. याशिवाय, सद-रचा पास संपूर्णत: निशुल्क आहे, असे यावेळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.

# सोलापूर येथे भाविक वारकरी मंडळाच्या वतीने अबू अझमीचा निषेध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर येथे भाविक वारकरी मंडळाच्या वतीने पार्क चौक सोलापूर येथे अबू अझमीचा जाहीर निषेध करण्यात आला. रस्त्यावर नमाज साठी उत्तर प्रदेश मध्ये योगिनी जे धोरण जाहीर केले त्यावर बोलण्यासाठी त्यांनी वारी व पालखी मार्ग याविषयी उदाहरण दिले ते खूप चुकीचे होते म्हणून त्यांचा निषेध व्यक्त केला. वारीही केवळ पायी चालत जाणे नसून मार्गावर असणारी सर्व गावे, वाडी, वस्ती, आरोग्य स्वच्छता व पर्यावरण संस्कार, विवेक इत्यादींचे बिजा रोपण करणारी वारी आहे. म्हणून महाराष्ट्रामध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये आंदोलन केली जाईल असा इश-ारा सुधाकर इंगळे महाराज( राष्ट्रीय अध्यक्ष) यांनी याप्रसंगी दिला.

यावेळी बोलताना झेंडा हा काठी सहित असतो प्रसंगी ती काटे आम्ही उलटी करायला कमी करणार नाही असे बळीराम जांभळे महाराज (राष्ट्रीय सचिव) यांनी मत व्यक्त केली. याप्रसंगी ज्योतीराम चांगभले( प्रदेश अध्यक्ष) मोहन शेळके (प्रदेश सचिव) बंडोपंत कुलकर्णी( जिल्हाध्यक्ष) अविनाश पाटील इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर सोशल मिडियावरची आध्यात्मिक वाटचाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर हे श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या भक्तांसाठी एक अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र आहे. या पुण्यभूमीच्या सेवेत कार्यरत असलेली श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर ही संस्थानिक अधिकृत संस्था आपल्या परंपरेप्रमाणे भाविकांच्या सेवेसाठी वेगवेगळ्या माध्यमांतून कार्यरत आहे. त्यातीलच एक आधुनिक साधन म्हणजे Instagram अकाऊंट, ज्याने गेल्या काही वर्षांत एक वेगळीच ओळख निर्माण केली आहे.

अकाऊंटची सुरुवात २०२१ आणि २०२४ पर्यंतचा प्रवास:

श्री मंदिर समितीने Instagram वर आपले अधिकृत पेज @vitthalrukminimandir_official या नावाने सुरू केले, त्यामागे मुख्य उद्देश होता –

✻ देवस्थानाच्या उपक्रमांची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे

✻ वारी, उत्सव, सेवा, सुविधा, अपडेट्स या सर्व गोष्टी सोशल मीडियाच्या माध्यमातून सहज भाविकांपर्यंत पोहोचवणे

सुरुवातीला काही हजार फॉलोअर्सपासून या अकाऊंटने आपला प्रवास सुरू केला. नियमित अपडेट्स, दर्जेदार फोटो/व्हिडीओ, कार्यक्रमांचे Live अपडेट्स, भाविकांच्या अनुभवाचे दर्शन या सर्वांमुळे २०२४ च्या अखेरीस हे अकाऊंट सुमारे ६६ घ फॉलोअर्स पर्यंत पोहोचले होते.

२०२५ मध्ये झालेली लक्षणीय वाढ:

२०२५ मध्ये आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर व भाविकांसाठी डिजिटल सेवा व सुविधा (जसे की टोकन दर्शन प्रणाली, QR ॲप लिंक, अधिकृत वेबसाइट, Facebook पेज लिंक इ.) यामध्ये मोठा सुधारणा करण्यात आली. याचाच सकारात्मक परिणाम Instagram वर दिसून आला.

✻ नियमित reels, stories आणि भक्तांच्या भावना मांडणारी पोस्ट्स

✻ देवदर्शन Live कार्यक्रम

✻ अधिकृत ॲपचे QR कोड highlight मध्ये देऊन लोकांना सुविधा उपलब्ध करून देणे

✻ डिझाइन केलेले पोस्ट्स व कार्यक्रम सूचना

या सर्व गोष्टींमुळे अकाऊंटने अल्प कालावधीत २.५१ लाख (२५१K) फॉलोअर्सचा टप्पा ओलांडला.

आकडेवारीनुसार यश:

✻ १.५ कोटी व्ह्यूज(गेल्या ३० दिवसांत) – Instagram वरचे हे एक मोठे यश.

✻ 0 Following असूनही फक्त शुद्ध भक्तिमय व आध्यात्मिक सामग्रीच्या जोरावर प्रचंड पोहोच.

यशामागचं कारण:

✻ सतत अपडेट्स

✻ आधुनिक माध्यमांचा समन्वय

✻ पारदर्शक, अधिकृत माहिती

✻ Digital भक्तीचे सुंदर दर्शन

✻ सह अध्यक्ष सर्व समिती सदस्य, कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापक यांच्या मार्गदर्शनाखाली संगणक विभागाचे नियोजन

अधिक माहिती साठी आजच फॉलो करा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर खाते

https://www.instagram.com/vitthalrukminimandir_official

# जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा दरेगाव येथे इयत्ता पहिली प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा दरेगाव तालुका सिंद-खेड राजा येथे शाळेचा प्रवेशोत्सव – ज्ञानाच्या प्रवासाची सुरुवात दि. २३ जून २०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दरेगाव, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा येथे इयत्ता पहिलीतील चिमुकल्यांसाठी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदात पार पडला. पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षक यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

इयत्ता पहिलीतील चिमुकल्यांचे औक्षण करून त्यांचे शालोपयोगी साहित्य व मिठाई देऊन स्वागत करण्यात आले. नवागत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प गुच्छ देऊन या सुंदर क्षणाची आठवण जपली गेली. सरपंच पती रवि मांटे . उपसरपंच प्रकाश काळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला गेला.

शा.व्य.स. अध्यक्ष पती अनिस पठाण व सदस्य, अंगणवाडी सेविका, पत्रकार व शिक्षकवृंद यांच्या उपस्थितीत गुलाब पुष्प, चॉकलेट, पाठ्यपुस्तक, गणवेश, बूट व मोज्यांचे वितरण करून नवागतांचे जंगी स्वागत करण्यात आले. उपस्थित सर्वांना गोड भाताचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या समाप्तीला सर्व विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. प्रत्येक मूल शाळेच्या कुशीत, शिक्षण घेईल आनंदी मनात! शाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व शिक्षकवृंद, पालक, आणि ग्राम स्थांचे मन:पूर्वक आभार! उपस्थित. मुख्याध्यापक . रमेश मांटे.सर .हुसळकर सर.दिलीप चव्हाण सर.इव्वरकर सर . पत्रकार.आत्माराम बंगाळे. अनेक गावकरी पालक उपस्थित होते

# रस्त्यावर कचरा टाकल्यास होणार दंडात्मक कारवाई : मुख्याधिकारी महेश रोकडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : पंढरपूरात आषाढी यात्रा सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने भाविक, वारकरी येतात. सोहळ्यानिमित्त भाविकांचे, वारकऱ्यांचे दशमी, एकादशी व व्दादशी असे तीन दिवस वास्तव्य असते. त्यामुळे वारकरी, भाविकांचे आरोग्य चांगले राहणे गरजेचे आहे. याकरीता पंढरपूर नगरपालिका स्वच्छता मोहिम राबवत आहे. मात्र, शहरातील व्यक्ती, दुकानदार, व्यावसायिक, मठधारक, किरकोळ विक्रेते हे रस्त्यावर कचरा टाकणे, कचरा जाळ-णे, तसेच उघड्यावर लघुशंका करणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, उघड्यावर मलविष्ठा, मुत्रविष्ठा करणे, उघड्यांवर शौच करणे टाळावे, अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल, अशा सुचना मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिल्या आहेत.

पंढरपूर नगरपरिषदेने जाहीर सूचनेद्वारे



आवाहन केले आहे की, केंद्र शासनाने अधिसूचना क्रमांक एस.ओ. १३५७ (३) दि. ०८ एप्रिल २०१६ अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम लागू केले आहेत. या नियमांची अंमलबजावणी शहरांमध्ये प्रभावीपणे चालू आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या तरतुदी-चे अनुपालन न करणार्या व्यक्ती, सेवा, दुकानदार, व्यावसायिक, मठधारक, किरकोळ विक्रेते यांच्याकडून नियमाचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई करत दंड वसूल करण्यात येणार आहे.

### अशी असेल दंडात्मक कारवाई

- ■ रस्त्यावर कचरा टाकणे-१८० रुपये दंड
- ■ कचरा जाळण-५००० रुपये दंड
- ■ उघड्यावर लघुशंका करणे, १००० रुपये दंड
- ■ सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, १५० रुपये दंड
- ■ उघड्यावर मलविष्ठा, मुत्रविष्ठा करणे-२०० रुपये दंड
- ■ उघड्यांवर शौच करणे – ५०० रुपये दंड

दंड वसूल करण्यासाठी आरोग्य निरीक्षक, मुकादम, प्राधिकृत केलेले कर्मचारी यांना अधिकार देण्यात येत आ-हेत. तरी घनकचरा अधिनियम धोरणातील तरतुदींची अंमलबजावणी करून आ-पले शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिक, भाविक, वारकरी, दुकानदार यांनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

महास्वच्छता अभियान कार्यक्रमास ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही पंढरपूर शहरातील सर्व नागरिक व्यापारी, व्यावसायिक यांनी आपापल्या दुकानासमोर कचरा टाकण्यासाठी छोट्या छोट्या कचरा पेट्या ठेवाव्यात. त्यामध्येच कचरा टाकून तो नगरपालिकेच्या कचरा संकलन टीम कडे द्यावा. त्याप्रमाणेच विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूर नगरीत येणार्या वारकरी, भावी यांनीही कचरा कोठेही रस्त्यावर टाकू नये. नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या जवळपासच्या कचराकुंड्यामध्येच कचरा टाकावा, असे आवाहन केले होते. असेही मुख्याधिकारी श्री रोकडे यांनी सांगितले.

**निफाड मोरे महाविद्यालयात रोपवाटिका उद्घाटन**

**वृक्ष रोप वितरण व वृक्षदींडी सोहळ्याचे आयोजन**

# वृक्षारोपण आणि संवर्धन चळवळीत सर्वांनी सहभाग नोंदवावा : क्षीरसागर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

विकासाच्या विविध कारणामुळे वृक्षांची तोड मोठ्या प्रमाणात होत असून त्यातून मोठ्या प्रमाणात पर्यावरणीय प्रश्न तयार झालेले आ-हेत. जागतिक तापमानात मोठी वाढ होत आहे. वाढत्या तापमान वाढीमुळे मानवास वेगवेगळ्या नैसर्गिक आ-पत्तींना समोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत कर्मवीर गाणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयाचे पर्यावरण संरक्षण चळवळ सक्षम करण्यासाठी व लोकजागृती करण्यासाठी निर्माण केलेली रोपवाटिका व वृक्षदिंडी सो-हळा अतिशय उत्तम आणि समाजाला दिशा देणारा आहे. विद्यार्थ्यांनी यातून प्रेरणा घेऊन आपल्या शेतात, परिसरात रोपांची लागवड करून त्याचे संवर्धन करावे असे प्रतिपादन मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी केले.

म. वि. प्र. समाजाचे, कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात आयोजित केलेल्या दहा हजार रोपांच्या रोपवाटीका उद्धाटन, वृक्षरोप वितरण व वृक्षदिंडी सोहळा कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. ....यावेळी व्यासपीठावर प्रविण राऊत (वनपरिक्षेत्र अधिकारी निफाड) नवनाथ गांगोडे (वनपरिमंडळ अधिकारी निफाड) श्रीमती कल्पना पाईकराव (वनरक्षक अधिकारी निफाड) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे आदि उप-स्थित होते.



या प्रसंगी प्रविण राऊत म्हणाले की, पर्यावरण संवर्धन आणि रक्षण ही काळाची गरज आहे. आज माना-वने पर्यावरणाचे रक्षण केले नाही तर पुढील काळात संपूर्ण जगाला मोठी किमंत मोजावी लागेल. निफाड महाविद्यालयाचे पर्यावरण संवर्धनातील राबविलेले विविध उपक्रम हे कौतुकास्पद आणि सर्वासाठी अनुकरणीय आहे.'' असे गौरवाउद्गार काढले. प्रस्ताविकेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे म्हणाले, '' कर्मवीरांच्या विचारांचा वसा आणि वारसा जतन करीत महाविद्यालय दैनंदिन अध्यापनाबरोबर विविध उपक्रम राबवित असते. प्रत्येकाने विठ्ठलाचे झाड, एक मूल तीस झाडे आणि माझा वाढदिवस माझे झाड ह्या उपक्रमांतर्गत रोपांची लागवड केली जाणार असल्याची माहिती दिली आणि यातून निश्चित पर्यावरण रक्षणा-ची जबाबदारी निफाड महाविद्यालय यशस्वीपणे पूर्ण करेल असा विश्वास या प्रसंगी त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी नवनाथ गांगोडे व श्रीमती कल्पना पाईकराव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते १०,००० रोपवाटिकेचे उद्घाटन करून वृक्षदिंडी मिरवणूक, वृक्षपूजन व वृक्षारोपण करून करण्यात आले कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील वनस्प-तीशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राष्ट्रीय छात्र सेना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन आणि सूत्रसंचालन प्रा.डॉ. महेश बनकर यांनी केले तर आभार प्रा. ज्ञानेश्वर मोगल यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. अभय वडघुले, डॉ. रोहिदास शिंदे, प्रा. भाऊसाहेब मुंतोडे, प्रा. शंकर गायकवाड, श्रीमती मनीषा कोटकर, पुनम ठाकरे, ऋचा जगताप, सविता कापसे, दीपिका जेऊघाले, पल्लवी खापरे, ऋतुजा आहेर, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर सेवक यांनी परिश्रम घेतले.

दैनिक
यश सिद्धि न्यूज
बुधवार दि. २५ जून २०२५ ४

# श्रीरामनगर येथे कांदा चाळीत युरिया टाकून अज्ञात व्यक्तीकडून नुकसान करण्याचा प्रयत्न




## कांदा चाळीची पोलिस पाटील, पोलिस, तलाठी यांचेकडून प्रत्यक्ष पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील श्रीरामनगर येथील कांदा उत्पादक शेतकरी सोमनाथ सखाराम शिंदे ह्या एका शेतकऱ्याच्या कांदा चाळीत अज्ञात व्यक्तीने मुद्दाम युरिया टाकून नुकसान करण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असून, परिसरात या प्रकारामुळे खळबळ उडाली आहे.



श्रीरामनगर ता.निफाड येथील कांदा उत्पादक शेतकरी सोमनाथ सखाराम शिंदे यांची वस्ती नाशिक -छात्रपती संभाजीनगर महामार्गाच्या जवळ व निफाड शिवाराच्या लगत आहे शिंदे यांनी मोठ्या कष्टाने आपल्या शेतात रब्बी उन्हाळ कांदा पिकविला कांद्याला मार्केटमध्ये भाव कमी असल्याने जवळपास तीनशे क्विंटल कांदा चाळीत साठऊन ठेवला आहे. आपल्या मेहनतीचे व कष्टाचे चिज व्हावे आपल्याला उन्हाळ कांदा विक्रीतुन जादाचा आर्थिक फायदा व्हावा या हेतुने कांद्याची साठवनुक केली आहे मात्र विकासाकडे वाटचाल करणाऱ्यां

> **कांदा पिकाच्या उत्पादनासाठी मोठा खर्च झाला आहे.कांदे काढल्यानंतर मार्केटमध्ये कांद्याला योग्य व पाहीजे असे बाजारभाव नसल्याने कुटुंबाच्या विचाराने कांदा चाळीत साठवण्याचा निर्णय घेतला आता ज्या भागात अज्ञात व्यक्तीने युरीया टाकुन नुकसान करण्याचा प्रयत्न केला आहे तेथील कांदा कोणत्याही परिस्थितीत मिळेल त्या बाजारभावात विकावा लागणार आहे.**
>
> **– सोमनाथ शिंदे (कांदा उत्पादक,श्रीरामनगर)**

या शेतकऱ्यांचे परिसरात कोणी दूष्मन असेल अशी शंकाच नाही काल रात्री अज्ञात व्यक्तीने तीनशे क्विंटल कांदा साठविलेल्या कांदा चाळीवर युरीया फेकुन मोठी नुकसान करण्याचा इरादा कृतीतून व्यक्त केला आहे.

कांदा उत्पादक शेतकरी सोमनाथ शिंदे यांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यानी श्रीरामनगरचे पोलिस पाटील रविंद्र शिंदे यांना फोनद्वारे माहिती दिली प्रत्यक्ष पाहनी नंतर अज्ञात व्यक्ती विरुध्द निफाड पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली निफाड पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली हवा नितीन सांगळे यांनी प्रत्यक्ष कांदा चाळीची पाहनी करुन पुढील तपास करीत आहे.दरम्यान महसुल विभागाच्या वतीने श्रीराम नगरचे तलाठी आईटवार व निफाडचे तलाठी खडांगळे यांनी कांदा चाळीला भेट देऊन पाहनी केली आहे.

---

# निफाड येथे नाशिक ग्रामीण जिल्हाध्यक्ष महेंद्र पगारे यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

निफाड तालुक्यात कॉंग्रेस भवन येथे स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे नवनिर्वाचित नाशिक ग्रामीण जिल्हाध्यक्ष महेंद्र पगारे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल सत्कार स्वारीपच्या कार्यकत्यांनी केला

> **स्वारिपच्या तालुकाध्यक्ष पदी सुरेश खडताळे तर शहराध्यक्ष पदी दादाभाऊ काऊटकर यांची निवड**

या कार्यक्रमाचे अध्यक्ष नरहरी निर्भवणे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाध्यक्ष महेंद्र पगारे भगवान गरूड (ना. जि.संपर्क प्रमुख)किशोर जाधव (उत्तर महा.अध्यक्ष)अनीता गडाधरा (महीला जिल्हाध्यक्ष) उपस्थित होते

याप्रसंगी महेंद्र पगारे यांनी पक्षाचे ध्येय धोरण व जबाबदाऱ्या या संदर्भात मार्गदर्शन केले असून जुनी निफाड कार्यकारणी बरखास्त करून नवनिर्वाचित निफाड तालुकाध्यक्ष म्हणून.... सुरेश खडताळे तर शहर अध्यक्ष पदी. दादाभाऊ काऊटकर यांच्या निवडीची घोषणा जिल्हाध्यक्ष महेंद्र पगारे यांनी केली.

यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्र पगारे भगवान गरूड (ना.जि.संपर्क प्रमुख)किशोर जाधव (उत्तर महा.अध्यक्ष) अनिता गडाधरा (जिल्हाध्यक्ष महीला) मोहन जावळे (जेष्ठ नेते) शामभाऊ पगारे, राहुल गांगुर्डे प्रविण गायकवाड प्रकाश गायकवाड अमोल बोठारे आकाश गायकवाड प्रतीक पगारे सुजीत




भालेराव नवनाथ पगारे किरण मोरे अरूण सोनवणे रोहन रणधीर आकाश गोतीश आदी कार्यकर्ते उपस्थित होते

---

# २९ जून ते ०७ जुलै पर्यंत पालखी मार्गावरील वाहतुक मार्ग बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर दि.२४(जिमाका):- उपविभागीय पोलीस अधिकारी, अकलुज उपविभाग अकलुज यांनी त्यांचेकडील पत्र जावक २११२ /२०२५ दिनांक १२ जून २०२५अन्वये दि. २९ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत श्री क्षेत्र पंढरपूर येथे आषाढीवारी सपंन्न होत आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दि. ३० जुन २०२५ रोजी नातेपुते पोलीस ठाणे हददीत व दिनांक ०१ जुलै २०२५ रोजी श्री तुकाराम महाराज यांची पालखी अकलुज पोलीस ठाणे हददीत प्रवेश करणार आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी ही नातेपुते, माळशिरस, वेळापूर, भंडीशेगाव वाखरी मार्गे पंढरपूर कडे येत असते. श्री संत तुकाराम महाराजांची पालखी अकलुज, श्रीपुर, बोरगांव, तोंडले-बोडले, पिराची कुरोली, भंडीशेगाव, वाखरी मार्ग पंढरपूर कडे येत असते, दोन्ही पालखी सोहळयात लाखो वारकरी सहभागी होणार असल्याने वारकरी हे पायी पंढरपूर कडे येत असतात. पालखी बरोबर त्यांचे दिंडया व वाहने ही सोबत असतात त्यामुळे पालखी मार्गावर वाहतुकीची कोंडी होवु नये याकरीता पालखी सोहळया दरम्यान पालखी सोहळयातील वाहने वगळता इतर सर्व वाहनांना प्रवेश बंद करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ च्या कलम ३३ (१) (ब) अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद व पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये दि. २९ जुन २०२५ रोजी ००.०१ ते ०७ जुलै २०२५ रोजी २४.०० वाजे पर्यंत अकलुज व पंढरपूर या पालखी मार्गावर वाहतुकीची कोंडी निर्माण होवू नये म्हणून पालखी दिंडयासोबत असणारी वाहने यांचेशिवाय इतर सर्व प्रकारच्या वाहनांना (अत्यावश्यक सेवेची वाहने वगळून) उपलब्ध असणारे पर्यायी मार्गाचा वापर करावा असा आदेश देत आहे.

मार्ग पुढील प्रमाणे

पंढरपूर कडून पुणे येथे जाणारे वाहनांकरीता पर्यायी मार्ग - वाखरी-साळमुख फाटा-पिलीव-म्हसवड-फलटण किंवा पंढरपूर-टेंभुर्णी-पुणे

पुणे-फलटण येथुन पंढरपूर कडे येणा-या वाहनांकरीता पर्यायी मार्ग- फलटण-म्हसवड-पिलीव-साळमुख चौक-पंढरपूर . किंवा पुणे-टेभुर्णी-पंढरपूर .

वेळापूर येथुन पंढरपूर कडे येणा-या वाहनांकरीता- पर्यायी मार्ग- साळमुख चौक-सातारा रोड-पंढरपूर

सांगोला येथून पुणे कडे जाणा-या वाहनांकरीता (सांगोला येथून पुणेकडे जाणारी जड वाहतुक वगळून) पर्यायी मार्ग - सांगोला-साळमुख चौक वेळापूर-अकलुज-इंदापूर.

पुणे येथुन इंदापूर मार्ग पंढरपूर येथे येणारी वाहने पर्यायी मार्ग- पुणे-टेंभुर्णी-पंढरपूर

अकलूज येथून पंढरपूर मार्गे सोलापूर कडे जाणारी वाहने - पर्यायी मार्ग- अकलुज-टेभुर्णी-सोलापूर सोलापूर येथुन पंढरपूर मार्गे अकलुज कडे जाणारी वाहने- पर्यायी मार्ग- सोलापूर-टेंभुर्णी-अकलुज

सदरचा आदेशाचा अंमल हा दिनांक २९ जुन २०२५ रोजी ००.०१ वा. पासुन ते ०७ जुलै २०२५ रोजी २४.०० वा पर्यत अंमलात राहील.

असा आदेश पोलीस अधिक्षक (सोलापूर ग्रामीण) शिरीष सरदेशपांडे यांनी दिला आहे.

---

### समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा समाजरत्न पुरस्कार - २०२५ देऊन होणार गौरव

# श्री पाणबुडी देवी कलामंच (मुंबई) तर्फे कलगी-तुरा कलेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : कोकणातील पारंपरिक लोककला होळी आणि गणेशोत्सव हे कोकणातील खरे खुरे उत्सव.या दोन्ही उत्सवासाठी येथील शेतकरी मोकळा असतो.भाताची लावणी संपली की घरोघरी गणपती येतात आणि भाताची कापणी /मळणी संपताच शिमग्याचे म्हणजेच होळीचे वेध लागतात. कोकणातील या दोन्ही सणांशी येथील लोककला निगडीत आहेत.शक्ती-तुरा (जाखडी ) हा सामूहिक नृत्याचा प्रकार आहे.गणेशोत्सवात गावतल्या प्रत्येक वाडीत जाखडीचा संच असतो.आठ गडी फेर धरून वादकांच्या भोवती नाचतात. ढोलकी आणि घुंगरू ही पारंपरिक वाद्य आणि आधुनिक ढंगाची गाणी यांचा मेळ जाखडीत असतो.जाखडीत आता अनेक बदलझालेत.वेशभूषा,प्रकाशयोजना,संगीत आणि वाद्यवृंद यांनी सध्याची जाखडी वेगवान आणि रंगीतसंगीत बनली आहे. आता जाखडीचा जंगी सामना जणू प्रेक्षकांसाठी पर्वणी असते.कोकणातील लोककला हीच जतन करण्यासाठी आणि रसिक मनोरंजनासाठी रायगड - रत्नागिरी असा दिग्गज शाहिरांचा जंगी मुकाबला होणार आहे.यामध्ये शक्तीवाले शाहीर प्रभाकर धोपट यांच्याविरुद्ध तुरेवाले शाहिर ज्ञानदीप भोईनकर शक्ती-तुरा रसिकांचे मनोरंजन करणार आहेत.रसिक हो आपली उपस्थिती अनमोल असून हा सामना मंगळवार दि.१५ जुलै २०२५,रोजी रात्रौ ८.३० वा.मा.दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह,विले पार्ले,पूर्व ( मुंबई ) येथे होणार आहे.या सामन्याचे आयोजन श्री पाणबुडी देवी कलामंच ( मुंबई ) यांनी केले असून अधिक माहितीसाठी किंवा तिकीटसाठी




९९३०५८५१५३ /९८३३६८९६४२ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

तसेच या कार्यक्रमानिमित्त सामाजिक पटलावर अधोरेखित व्हावा असा स्तुत्य उपक्रम समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा श्री पाणबुडी देवी कलमंच,मुंबई यांच्यावतीने गौरव होणार असून त्यांना समाजरत्न पुरस्कार - २०२५ देऊन त्यांच्या कार्याचा गौरव होणार आहे.यामध्ये प्रमोदजी गांधी -( उद्योजक/संपर्क अध्यक्ष - मनसे ता. गुहागर ),रविंद्रजी मटकर -( अध्यक्ष - नमन लोककला संस्था ( रजि.),रंगनाथ गंगाराम गोरीवले - ( चिकन्या भाई )अध्यक्ष - भैरी भवानी देवस्थान कमिटी,धोंडिबा दळवी -(संचालक-श्री गुळंबाई देवी विकास सेवा सोसायटी,कळसगादे),दिनेशजी कुरतडकर-(संस्थापक - कोकण कलामंच,मुंबई,),अरविंद मोरे माऊली-( अध्यक्ष - श्री समर्थ कृपा भजन मंडळ (नालासोपारा -विरार ) या सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींचा समाजरत्न पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात येणार आहे.सदर कार्यक्रमाचे निवेदन शाहीर शाहीद खेरटकर करणार आहेत.

---

### अतिक्रमण धारकांसाठी शासनाची खास घरकुल आवास योजना

### मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार

# नळदुर्ग शहरातील अतिक्रमण धारकानो, एएचपी घरकूल योजनेत सहभागी व्हा आणि पक्के घर मिळवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

नळदुर्ग शहरातील सर्व अतिक्रमण धारकांनी नळदुर्ग नगरपरिषद मध्ये शासनाने अतिक्रमण धारकांसाठी खास योजना सुरू केली आहे ती म्हणजे ए एच पी योजना या योजने अंतर्गत जे बेघर अतिक्रमण धारक आहेत ज्यांना आपल्या कुटुंबाचा उदार निर्वाह करण्यासाठी जागा नाही परंतू ते लाभार्थी अतिक्रमण करून राहातात आशा अतिक्रमण लाभार्थाना ए एच पी अंतर्गत घरकुल योजना राबविण्यात येणार आहे .

जे अतिक्रमण धारक आहेत अशा लाभार्थ्यांना ही योजना परवडणारी असून नळदुर्ग शहरातील अतिक्रमण धारकांनी या ए एच पी योजने अंतर्गत घरकुल योजना मिळण्यास पात्र राहाणार आहेत आशा लाभार्थ्यांनी नगर परिषदेत तात्काळ आपली नोंदणी करावी आणि खालील कागदपत्राची पूर्तता करावी १ ) तहसीलचे रहिवासी २ ) तहसिलचे उत्पन्न ३ ) शिधापत्रिका ४ ) बँक पासबुक ५ ) कुटुंबाचे आधार कार्ड वरिल कागदपत्र नगर अभियंता समीर मोकाशी यांच्याकडे सादर करावेत असे आव्हान नळदुर्ग नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार व अभियंता समीर मोकाशी यांनी केले आहे .



नळदुर्ग शहरामध्ये ए एच पी योजना राज्यात ३० ु ४० वर्ग मीटर अंतर्गत ही योजना राबविण्यात येणार आहे शासनाच्या योजने अंतर्गत जितका निधी या योजनेला मिळणार आहे त्या योजने मध्ये लाभार्थ्यांनी उर्वरित लोकवाटा लाभार्थानी भरणे बंधनकारक आहे या लाभार्थांना त्यांच्या हक्काचे व पक्के घर मिळण्यासाठी मदत होईल . आज नळदुर्ग शहरातच नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्रात गोरगरीब कोणी पत्र्याचे शेड व दगड मातीचे कच्चे घर करून आपल्या कुटुबांच्या पोटाची खळगी भरतात आणि त्या पैशा मधून नळदुर्ग सारख्या शहरात जागा विकत घेऊन बांधकाम करणे परवडणारे नसून जे गरीब आहेत.

आणि अतिक्रमण करून राहातात आशा लाभार्थांना शासनाने ए एच पी या नावाने योजना चालू केली आहे या योजनेचा शहरातील सर्व अतिक्रमण धारक लाभार्थांनी तात्काळ लाभ घ्यावा आणि आपल्या हक्काचे व पक्के घर मिळवा आसे आवहान नगर परिषदेचे कर्तव्य दक्ष मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी केले आहे. नळदुर्ग दुर्गा नगर येथे किंवा शहरात ज्याना तुळजापूर तहसीलचे जाग्याचा कबाला आसल्याचे प्रमाणपत्र आहे आशा लाभार्थ्यांना त्यांना बि एल सी अंतर्गत प्रत्येक लाथार्थाना घरकुल आवास योजनेचा सहजा सहजी लाभ मिळू शकतो .

जो अतिक्रमण धारक अतिक्रमण करू राहतो त्यांनी तात्काळ ए एच पी योजनेचा नगर परिषदेचे अभियंता समीर मोकाशी यांच्या कडे वारील कागजपत्र देऊन फॉर्म भरावा आणि आपल्या हक्काचे व पक्के घर मिळवावे असे आव्हान नगरपालिकेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार आणि अभियंता समीर मोकाशी यांनी केले आहे.

---

# राष्ट्रीय टेनिस क्रिकेट पंच परीक्षा नाशिक येथे उत्साहात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

नाशिक टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडिया व टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथील विभागीय क्रीडा संकुल सभागृहात राष्ट्रीय टेनिस क्रिकेट पंचपरीक्षा उत्साहात संपन्न झाली.

राष्ट्रीय पंच परीक्षेच्या उद्घाटन प्रसंगी आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष कन्हैया गुजर व भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव मीनाक्षी गिरी , महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी, महाराष्ट्र उमन डायरेक्टर धनश्री गिरी, महाराष्ट्र टेनिस टेनिस टेक्निकल डायरेक्टर स्वप्निल ठोंबरे ,नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड इत्यादी उपस्थित होते .

आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष कन्हैया गुजर यांनी विद्यार्थ्यांना टेनिस खेळाबद्दल महत्त्व सांगितले तसेच भारतीय महासचिव मीनाक्षी गिरी यांनी विद्यार्थ्यांना पंच परीक्षा साठी शुभेच्छा दिल्या तसेच संदिप पाटील यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवसीय पंच परीक्षा मध्ये टेनिस क्रिकेट खेळाची नियमावली व नियम व प्रॅक्टिकल करून दाखवले यामध्ये भारतातील सर्व राज्यातील विद्यार्थ्यां, क्रीडा शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक यांनी पंच परीक्षेसाठी सहभाग नोंदवला. राष्ट्रीय पंच परीक्षेमध्ये धनश्री गिरी,दर्शन थोरात नंदकिशोर नाईक यांनी ए प्लस ग्रेड मिळून भारतात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष कन्हैया गुजर महासचिव मीनाक्षी गिरी, महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष विलास गिरी ,नाशिक टेनिस क्रिकेट असोसिएशन सचिव विलास गायकवाड धनंजय लोखंडे यांनी अभिनंदन केले व यांना सर्वांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.